सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्र. मजनिप्रा/२०१९/प्र.मा./गोमपाविम/११०/१०६ दिनांक : २९/०१/२०२०

प्रति,

**कार्यकारी संचालक**

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,

सिंचन भवन, जालना रोड,

औरंगाबाद-४३१ ००५.

**विषय : उनकेश्वर उच्च पातळी बंधारा, ता. किनवट, जि. नांदेड या प्रकल्पाच्या व्याप्तीत वाढ होत असल्याने मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.**

संदर्भ : १) का. सं. गोमपाविम, औरंगाबाद यांचे पत्र क्र. गोमपाविम/तां-३/उनकेश्वर उपाबं/सुप्रमा/९१४१ दि. १३/०९/२०१९

२) अ. अ. नांपामं, नांदेड यांचे पत्र क्र. नांपामं/ताशा-५/६७५८ दि. १९/११/२०१९

१.० संदर्भीय पत्रान्वये उनकेश्वर उच्च पातळी बंधारा, ता. किनवट, जि. नांदेड यांस मजनिप्राची मंजुरीस्तव प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रकल्प गोदावरी खोऱ्यातील पैनगंगा उपखोऱ्यातील उनकेश्वर गावाजवळ पैनगंगा नदीवर आहे. मूळ प्रकल्प हा कोल्हापूर पद्धतीचा (को.प.) बंधारा म्हणून प्रस्तावित असून त्यास का. सं. गोमपाविम, औरंगाबाद यांनी दि. १६/११/२००५ रोजी सन २००३-०४ चे दरसूचीनुसार रु. २.०७ कोटीचे अंदाजपत्रकास प्रमा प्रदान केली होती. मूळ प्रमानुसार, सदर को.प. बंधारा प्रकल्पाची साठवण क्षमता २.१७ दलघमी असून २८१ हेक्टर क्षेत्र सिंचित करण्याचे प्रस्तावित होते.

२.० तदनंतर उनकेश्वर को. प. बंधाऱ्याचे उच्च पातळी बंधाऱ्यामध्ये रुपांतरीत केले. प्रस्तावित प्रथम सुप्रमा प्रस्तावानुसार प्रकल्पाचा वार्षिक पाणीवापर ९.६९ दलघमी असून सिंचनासाठी ७.७५ दलघमी व १.९४ दलघमी बाष्पीभवनासाठी पाणीवापर नियोजित आहे. सदर प्रकल्पाद्वारे १४६० हे.

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.
Tel. : +91 22 2215 2019, Email : mwrra@mwrra.in | Website : www.mwrra.org

क्षेत्र सिंचित होणार आहे. सदर प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रामध्ये २८१ हे. वरुन १४७० हे. वाढ म्हणजे ४१९.५७% वाढ झालेली आहे. तसेच जलसाठ्यात २.१७ दलघमी वरुन ९.६९ दलघमी वाढ म्हणजे ३४६.५४% वाढ झालेली आहे. हा व्याप्ती बदल असल्याने सदर प्रकल्पस मजनिप्राची मान्यता आवश्यक आहे.

३.० महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ११(च) नुसार नवीन प्रकल्पांना मान्यता देणेपूर्वी खालील निकषांच्या अनुषंगाने प्राधिकरणाने तपासणी करणे गरजेचे आहे;

३.१ **प्रकल्प एकात्मिक राज्य जल आराखड्याचा (एराजआ) भाग असणे** - मंजूर एराजआचे Volume II A - Summary Sheets मधील पृ. १६९ मध्ये विषयांकित प्रकल्पाची तरतूद आहे. म्हणजेच विषयांकित प्रकल्प एराजआ चा भाग असल्याचे दिसते. तथापि, सदर प्रकल्पाची एराजआ मधील एकूण पाणीवापराची तरतुद (९.३९० दलघमी) व अहवालामधील प्रस्तावित प्रथम सुप्रमा नुसार तरतुद (९.६९० दलघमी) आहे, जी एराजआ मधील एकूण पाणीवापराची तरतुदीपेक्षा जास्त आहे.

३.२ **प्रकल्प जलवैज्ञानिक दृष्ट्या viable असणे** - मु. अ. जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांना सदर प्रकल्पास प्रस्तावित प्रथम सुप्रमा नुसार दि. ०३/०७/२००९ रोजीच्या पत्रान्वये ५०% विश्वासर्हते नुसार ९.६९ दलघमी पाणी प्रकल्पस्थळी उपलब्ध असल्याचे प्रमाणित केले आहे. तदनुसार सदर प्रकल्प जलवैज्ञानिक दृष्ट्या सुसंगत वाटतो.

३.३ **प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य असणे** - सदर प्रकल्पाची सन २०१६-१७ चे दरसूचीनुसार प्रस्तावित प्रथम सुप्रमा किंमत रु. १७४.९३ कोटी आहे. सदर प्रकल्पाची प्रति स.घ.मी. किंमत रु. १,८०,५३२ असून ती शा. नि. दि. १३/०७/२०१८ नुसार रु. १,७०,३२३ पेक्षा जास्त असल्याने सदर प्रकल्प लघु प्रकल्पाच्या प्रति स.घ.मी मापदंडामध्ये बसत नाही. सदर प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर ०.७२ असून लघु प्रकल्पाच्या मापदंडात (१.००) बसत नाही. तसेच, सदर प्रकल्पाचा आर्थिक परतावा दर ८.४२% असून तो ल.पा प्रकल्पाच्या १२% मापदंडापेक्षा कमी असल्याने सदर प्रकल्प आर्थिक परतावा दराच्या मापदंडामध्ये बसत नाही. सबब, सदर प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य वाटत नाही.

३.४ **प्रकल्प पर्यावरणीय दृष्ट्या viable असणे** - सदर प्रकल्पाच्या प्रमाचे वेळी (दि. १६/११/२००५), पर्यावरण विभागाची सन १९९४ च्या अधिसूचनेनुसार फक्त मोठे सिंचन प्रकल्पांना पर्यावरण मान्यतेची आवश्यकता होती. सदर प्रकल्प लघु प्रकल्प असल्याने त्यास पर्यावरण मान्यतेची आवश्यकता नव्हती. सद्यस्थितीत पर्यावरण विभागाची सन २०१४ ची अधिसूचना लागु असून तदनुसार सदर प्रकल्पास पर्यावरण मान्यतेची

आवश्यकता नाही. तसेच सदर प्रकल्पामुळे कोणतेही वनक्षेत्र बाधित होत नाही असे क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित केले आहे.

३.५ **मा. राज्यपालांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांची पुर्तता करणे** - मा. राज्यपाल यांचे वर्ष २०१९-२० चे निदेशातील परि. १७ नुसार बांधकामाधीन प्रकल्पांची उर्वरित प्रचंड किंमत व thin resource spreading चा धोका टाळण्यासाठी राज्य शासनाने नवीन प्रकल्प मंजूर करण्यापूर्वी वेगळी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. नांदेड जिल्ह्यातील ८ बांधकामाधीन प्रकल्पांची एप्रिल २०१९ अखेर उर्वरित किं. रु. ५,९७८.९२ कोटी असून मागील पाच वर्षामध्ये सरासरी रु. ३७२.८९ कोटी निधी प्राप्त झाला आहे. सदर प्रकल्पासाठी वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मध्ये कोणतीही तरतुद केलेली नाही.

३.६ **आंतर-राज्यीय पाणी हक्कदारी** - सदर प्रकल्प पैनगंगा नदीवर असून निम्न पैनगंगा प्रकल्पाचे खालील बाजूस आहे. गोदावरी पाणी तंटा लवादानुसार महाराष्ट्र राज्यास निम्न पैनगंगा, वाघाडी व साईखेडा प्रकल्पाखालील ९.०० अघफू पाणी वापरण्यास मुभा असून कोणताही प्रकल्पाचा पाणीवापर १.५० अघफू पेक्षा (४२.४७ दलघमी) पेक्षा जास्त असून नये. सदर प्रकल्पाचा पाणीवापर ९.६९० दलघमी असून तो लवादाच्या तरतुदीच्या आत आहे.

४.० परि. ३.३ नुसार विषयांकित प्रस्ताव आर्थिकदृष्ट्या सुसंगत नाही. त्यामुळे मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम ११(च) मधील तरतुदीनुसार प्राधिकरणास विषयांकित प्रस्तावाला मान्यता देता येत नाही. सबब, विषयांकित प्रस्ताव परत करण्यात येत आहे.

(रसिक चौहान)
सचिव

प्रत

१) प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड मुंबई - ४०००३२.

२) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, सिंचन भवन, जालना रोड, आकाशवाणीसमोर, औरंगाबाद-४३१ ००५.

३) अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, वर्कशॉप, नांदेड - ४३१ ६०५.